# TOP TEN TIPS
# (Cardinal Rules)

## शेतकऱ्यांच्या शेतीशाळेमध्ये हे करा ! हे करू नका !

- शेतकऱ्यांबरोबर सहकार्याच्या भावनेतून एकत्रित काम करा.
- शेतकऱ्यांना आदेश किंवा हुकूम सोडू नका किंवा तुमच्यापेक्षा ते अडाणी आहेत असे समजू नका.
- शेतीशाळेतील प्रत्येक गोष्ट तुमच्या मनाप्रमाणेच झाली पाहिजे असा अट्टाहास धरू नका. शेतकऱ्यांच्या पध्दती, तंत्र याविषयी मनमोकळेपणे बोलण्याची त्यांना संधी द्या.
- शेतकऱ्यांना जे सांगावयाचे आहे ते उदाहरणासह स्पष्ट करा.
- जे शेतकऱ्याने करू नये असे वाटते ते तुम्ही चुकूनसुध्दा करू नका.
- जी गोष्ट शेतकऱ्याला शिकवायची आहे त्याबाबत त्यांना प्रश्न विचारून अंतिम उत्तर प्राप्त करण्याचा प्रयत्न करा.
- शेतकऱ्यांनी काढलेली निष्कर्ष त्यांनी का व कसे काढले याबाबत त्यांना प्रश्न विचारून माहिती मिळवा.
- शेतकऱ्यांना भाषण देऊ नका. तुम्ही सांगितलेले सर्व शेतकरी विसरून जातील परंतु त्यांनी स्वत: केलेली किंवा अनुभवलेली गोष्ट ते विसरणार नाहीत.
- शेतकऱ्यांनी स्वत:च्या प्रश्नांची उत्तरे स्वत: शोधण्यामध्ये तुम्ही मदत करावयाची आहे. शेतकरी हा त्याच्या क्षेत्रातील पिकाच्या ज्ञानासंबंधी सक्षम होईल याची काळजी घ्यावी.